# प्रकरण चौथे

## 'उतरंड' आशय व स्वरूप

# प्रकरण चौथे

## 'उतरंड' आशय व स्वरूप

विलास सिंदगीकर यांचा 'उतरंड' हा अनुक्रमे तिसरा कथासंग्रह आहे. संगत प्रकाशन, नांदेडच्या वतीने मार्च २००८ मध्ये हा कथासंग्रह प्रकाशित झाला. एकूण अकरा कथांचा समावेश असलेल्या या कथासंग्रहाच्या माध्यमातून समाज व्यवस्थेचे वास्तव व विदारक दर्शन घडवून संघर्षमय जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न सिंदगीकरांनी केलेला आहे. 'उतरंड' या संकल्पनेचा स्थूलपणे विचार करता ग्रामीण भागामध्ये पूर्वीच्या काळापासून घरा-घरांमध्ये शेतातील धान्याची जपणूक करण्यासाठी कुंभाराने तयार केलेल्या मातीच्या गाडग्याची रचना उतरत्या क्रमाने केलेली असते. सर्वात खाली मोठे गाडगे आणि त्यावर आकारानुसार एकावर एक गाडगे रचून जी रचना तयार केली जाते, त्याला 'उतरंड' म्हणतात. पण विलास सिंदगीकरांनी जी उतरंड वाचकांसमोर मांडली आहे. ती घरातली नसून समाजातील विषमतेची, जाती-धर्माची उतरंड आहे. या उतरंडीत जात-धर्म माणसाच्या अंत:करणात किती खोलवर रूजला आहे यांचे वर्णन या कथासंग्रहाच्या माध्यमातून त्यांनी केले आहे.

सिंदगीकरांच्या या कथासंग्रहातील कथा ग्रामीण जीवनातील वास्तववादी जीवनाचा वेध घेतात. आधुनिक काळात समाजातील माणूसकीचा ऱ्हास होत चालला आहे. म्हणूनच सामाजिक बांधिलकीशी प्रामाणिक राहून परिवर्तनवादी विचारसरणी घेऊन त्यांच्या कथा वावरताना दिसतात. विलास सिंदगीकरांचा 'उतरंड' हा कथासंग्रह म्हणजे अठरा पगड जातीच्या लोकांना एकत्र आणून ग्रामीण स्तरावरील जगण्याचा एक आलेख मांडतात. एक हरवलेल्या, हरवत चाललेला माणूस संवेदनशील भावनेने शोधण्याचा प्रयत्न सिंदगीकर करताना दिसतात. त्यामुळेच परिवर्तनाची नवी पहाट म्हणून 'उतरंड' या कथासंग्रहाचा उल्लेख करण्यास काहीच हरकत नाही.

## • 'उतरंड' या कथासंग्रहातील आशयसूत्र :

### १. धर्मांतरामुळे दलितांमधील निर्माण झालेल्या अंतर्गत संघर्षाचे चित्रण :

भारतासारख्या शेतीप्रधान व विकसनशील देशातील समाजव्यवस्था विषम आहे. या देशात जात, पात, धर्म, राजकारण या संकल्पनाची मूळ खोलवर रुजली गेली आहेत. समाजामध्ये अनेक प्रकारच्या, अनेक प्रवृत्तीच्या व्यक्ती वावरताना दिसतात. एकाच समाजामध्ये एकाच जातीचे लोक एकत्र राहत असले तरी त्यांच्यामध्ये अंतर्गत संघर्ष हा असतोच आणि हाच संघर्ष त्या समाजाला घातक ठरतो. म्हणजेच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करणाऱ्याला खाली खेचण्याची वृत्ती अजूनही फारशी कमी झाल्याचे दिसत नाही. 'उतरंड' या पहिल्या शीर्षक कथेतील आनंद जाधवाच्या कुटुंबाचे लेखकाने केलेले चित्रण त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. समाजामध्ये व्यवहार सांभाळत असताना जाती-धर्माचे, कुळाचे बंधन पाळले जाते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या परिवर्तनवादी विचाराने प्रभावित होऊन काकरे मांग असणाऱ्या मातंग समाजातील आनंद जाधव हा विज्ञानवादी बौद्ध धर्म स्वीकारतो आणि हिंदू धर्मातील सर्व रूढी-परंपरांचा त्याग करतो. दगड-धोंड्यातील देवत्वाला नाकारतो आणि गावोगावी जाऊन बौद्ध धर्माचा प्रसार-प्रचार करू लागतो. पण त्याच्या जन्माशी जोडलेल्या मांग समाजाने त्याला स्वीकारले नाही. गाव ही त्याच्यावर बहिष्कार टाकतो पण आनंद जाधव ठामपणे गावाला सांगतो की, "आम्हाला रोजी रोटीपेक्षा स्वाभिमान हवा आहे. आम्हाला इज्जतीचे जगणे उपभोगायचे आहे. आम्हाला गुलाम म्हणून जगायचे नाही."[१] आणि कोणालाही न जुमानता तो आपल्या दोन मुलांना शिक्षण देतो. जेव्हा आनंद जाधव याची मुलगी दीक्षा लग्नाची होते. तेव्हा मात्र या धर्मांतराचे चटके त्याला बसू लागतात. म्हणजेच दीक्षाशी विवाह करण्यास कोणताच मुलगा तयार होत नाही. त्याला कारण म्हणजे धर्मांतरीत बौद्धतत्व आड येते आणि सोयरीक मोडली जाते. पण आनंद जाधव जिद्द सोडत नाही. शेवटी कंधारात दीक्षाची सोयरीक जमते. लग्नाचा दिवस उगवतो, पण लग्नाचे वऱ्हाड येतच नाही. कारण त्या पाहुण्यांना कोणीतरी आनंद जाधव याने बौद्ध धर्म स्वीकारल्याची माहिती पुरवलेली असते.त्यामुळे दीक्षाच लग्न मोडते. दारातील हिरवा मांडव वाळतो. दीक्षाला मातंग

समाजाने स्वीकारले नसल्यामुळे आनंद जाधव विचारांच्या जाळ्यात सापडतो. तर इकडे दीक्षाच्या चेहऱ्यावरील हास्य मावळते. आपण धर्मांतरीत बौद्ध असल्यामुळे आपणाला कोणताही नवरा मुलगा स्वीकारत नाही म्हणून घरात गळफास लावून स्वत:ची जीवनयात्रा संपवते. एका उमलत्या कळीचा अंत होतो. पण त्या वाईट परिस्थितीतूनही आनंद जाधव एखाद्या फिनिक्स पक्ष्याप्रमाणे उभारी घेऊन आपल्या घराला सावरतो आणि आपला मुलगा राहूल याला पीएच.डी. पर्यंत शिक्षण देतो. राहूल ही डॉक्टरेटचा प्रबंध सादर करुन घरी येतो आणि एके दिवशी तो शिरूर या गावी गंगाधर गायकवाड साहेबाच्या मुलीच्या विवाहाला जातो. पण लग्नामध्ये काही अनपेक्षित प्रसंग घडून येतो. तो म्हणजे नवरा मुलगा मोटारसायकल न मिळाल्यामुळे लग्न मंडपातून पलायन करतो. पण नवरी मुलगी रूपाली हिचे पुढे काय ? या विचाराने गावातील लोकांच्यात सल्लामसलत होते आणि मांडव वाळू द्यावयाचा नाही या निर्णयाने मांडवामध्ये शिकलेला मुलगा राहूल याच्याशी त्याच्या मनाविरूद्ध जबरदस्तीने रूपालीशी विवाह लावून दिला जातो. काही दिवसानंतर रूपालीला व तिच्या वडिलांना राहूलचे कुटुंब मातंग नसून धर्मांतरीत बौद्ध आहेत, हे कळल्यानंतर राहूलचा संसार मोडला जातो. धर्मांतरासारख्या क्षुल्लक गोष्टीसाठी त्याच्या संसाराची राखरांगोळी होते. या घटनेनंतर राहूल पुन्हा एकदा विचारात मग्न होतो, "खरंच...धर्म जातीचा किती भूकेला आहे ? धर्माने जातीच्या हजारो उतरंडी निर्माण केल्या. बाबासाहेब म्हणाले होते, 'हिंदू धर्म म्हणजे मजल्याचे घर आहे. जो ज्या मजल्यावर जन्मला. शेवटी त्याला त्याच मजल्यावर मरावे लागते. इतकेच नाही, तर त्याने जातीजातीत अनेक उपजातीच्या उतरंडी निर्माण करून ठेवल्या आहेत. त्या कधीच एकत्र येऊन क्रांती करू शकत नाहीत. या जाती जातीतील उपजाती मोडल्याशिवाय खरी सामाजिक समता निर्माण होणार नाही. पण त्या कधीच एकत्र येऊ नये अशी व्यवस्था मनूने हजारो वर्षापासून करून ठेवली."[२]

उपरोक्त विधानावरून असे लक्षात येते की, तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये जाती व्यवस्थेची स्थिती किती भक्कम होती. समाजातील प्रत्येक जातीला एक विशिष्ट प्रकारची ओळख आणि त्या त्या जातीच्या श्रेष्ठ-कनिष्ठेतेवरून त्यांना मिळणारा कमी-अधिक दर्जा

आणि त्यानुसार त्यांना मिळालेल्या सुविधा यामध्ये भेदभाव दिसून येतो. त्याचबरोबर तत्कालीन समाजामधील सामाजिक वास्तवतेचे सजग भान वरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारातून आपणास स्पष्टपणे प्रत्ययास येते.

## २. अंधश्रद्धेच्या वाटेने जाणाऱ्या कथा :

आजच्या विज्ञान युगात ही अंधश्रद्धा मानवी मनाला चिकटून बसवलेली आहे. याचे चित्रण त्याच्या कथेतून येते. त्या दृष्टीने 'हाकमारी' आणि 'चिकनगुन्या' या कथांचा उल्लेख करावा लागेल. अजूनही मराठवाड्यासारख्या भागात शिक्षणाचा प्रसार म्हणावा एवढा झालेला नाही. 'हाकमारी' या कथेत 'हाकमारी' म्हणजे काय ? याची कल्पना ही या गावकऱ्यांना नसल्यामुळे गावाला स्मशानभूमीचे रूप प्राप्त झाले होते. एक प्रकारची दहशत गावात निर्माण झाली होती. ज्या दिवशी गावात हाकमारी यायची त्या दिवशी गावातील कुणाच्या तरी घरी चोरी होई आणि त्याची खूण म्हणून स्वस्तिकची रांगोळी काढली जाई. त्या रांगोळी शेजारी तीन लिंबू कापून ठेवले जात. त्या सोबत हळदी-कुंकू ही टाकलेले असे. त्यामुळे गाव जीव मुठीत घेऊन आला दिवस जगत होता. पण गावातील काही सुशिक्षित लोक या घटनेचा छडा लावण्याच्या हेतूने पोलिसांच्या सहाय्याने सापळा रचतात आणि या सापळ्यात हाकामारीच्या नावाखाली चोरी करणाऱ्या सात चोरांना पकडतात. चोरही पोलिसांच्या धाकाला घाबरून दत्ता गोसावी हा प्रमुख कर्ता करविता असून त्याच्या सांगण्यावरूनच गंगोत्री पाटलाच्या मुलाला अमावश्येच्या रात्री बळी देऊन गुप्तधन मिळविणार आहे, असे सांगतात अशा या पैश्याच्या लालसेपोटी, हापापलेल्या दत्ता गोसाव्याला पोलिस ताब्यात घेतात आणि त्यामुळेच हाकामारीसारख्या अफवेला बळी पडलेल्या गावासमोर सत्य काय आहे हे उघड होते. तसेच कावळ्याची लागण होणे हा ही अंधश्रद्धेचा भाग लेखकाने चित्रित केला आहे. तो असा, गावातील सटवा पाटील अंगणामध्ये दुपारच्या वेळेला बाज घालून बसला असता अचानक पाखरांच्या किलबिटाने त्याची नजर अचानक लिंबाच्या झाडावर जाते आणि जे दृश्य पाहू नये ते पाहतो. म्हणजेच त्याने कावळ्याची लागण म्हणजे कावळ्याचे मिलन पाहिलेले असते. त्यामुळे तो घाबरतो कारण कावळ्याचे मिलन पाहणे हा मोठा अपशकून मानला जातो. त्यामुळे

कावळ्याची लागण पाहताच तो तीन वेळा थुंकतो आणि ही बातमी आपल्या पत्नीला पार्वताला सांगतो. पार्वता ही घाबरते आणि म्हणते, "आवं कारभारी, उंबराचं फूल आन् कावळ्याची लागण बघनं लई वाईट आस्तूया बघा. आगुदरच मुलखात हाकमारीनं थैमान घातलंय आन तशात हे इपरित येऊ घातलं. तवा म्या म्हणते तीन तरी पावण्या रावळ्यांना निरोप धाडावा बघा."[३] असे म्हणून मयताची बातमी तीन नातेवाईकांना सांगण्याचा निर्णय घेतात. त्यामुळेच त्याच्या घरची साडेसाती जाणार असते. अशाप्रकारे ग्रामीण भागातील लोकांमध्ये रक्तामांसात अंधश्रद्धेचा संचार झालेला असतो. याचे चित्रण येते.

'हाकमारी' या कथेप्रमाणेच वाटचाल करणारी 'चिकनगुन्या' ही वास्तववादी विषय मांडणारी कथा आहे. मागील काही वर्षात चिकनगुन्या या रोगाने महाराष्ट्राला भेडसावले होते. चिकनगुन्या म्हटले की, लोक खूप घाबरून जात असतं, आणि तोच विषय विलास सिंदगीकरांनी थोड्याशा विनोदी अंगाने रंगविलेला आहे. चिकनगुन्या कशाने होतो ? यावर अनेक लोकांनी तर्क-वितर्क केले होते. त्या लोकांच्या म्हणण्यानुसार हा रोग चिकन खाल्यामुळे होतो असेही म्हटले जात होते. 'चिकनगुन्या' या कथेमध्ये देखील ग्रामीण भागातील अशिक्षित अडाणी स्त्रियांची अशी समजूत होती की, चिकनगुन्या हा देवीमायचा कोप झाल्यामुळे गावात आला आहे, आणि हाच विचार धुरपताने बोलून दाखवला. त्यावर हारणा म्हणाली, "मग देवाचा कोप न्हाय व्हणार तर दुसरं काय व्हणार? गावात दरसाली गडचांद्याच्या मायचा सण व्हायचा. गावानं तिचा सण केल्यावर ती गावाला कडं टाकून जायची मायनं कडं टाकल्यावर गावात मुंगी शिरायलाबी शिल्लक रस्ता ऱ्हात नव्हता. त्याच्यानं रोग येत नव्हता."[४] त्यावर धुरपताबाई देवाच्या पाया कोणीही पडत नसल्यामुळे हा रोग गावात आल्याचा निष्कर्ष काढते आणि यावर उपाय म्हणून सर्वजणी मरीआईचा गाडा सोडण्याचे ठरवितात आणि सगळ्या गावाची भगतीण मुदरीका हिच्याकडे जातात. पण मुदरीकाबाई ही स्वार्थी देवकरीन असल्यामुळे आणि त्यामध्ये भर म्हणून गावातून मरीआईचा गाडा काढायचा आहे हे ऐकताच ती मनात खूष होते. कारण ती ज्या क्षणाची वाट बघत होती, तो क्षण चालून तिच्याजवळ आला होता आणि त्याचा फायदा घेण्याच्या हेतूने ती मरीआईचा गाडा कसा

काढायचा हे सांगताना म्हणते, "उद्या शनिवार हाय... तुमी उद्याला सुताराकडून मऱ्याआईचा गाडा तयार करून आणा...मायसाठी एक हिरवं पातळ चोळीचा खण, हिरवा चुडा, नारळ, कापूर, उदबत्ती, सामान इकत घ्या. तिच्या ओटीत टाकायला पाच धान्य जमा करून ठेवा... मायची ओटी भरताना एकसे एक रूपया ओटीत दक्षणा म्हणून टाकावा लागतो. परवा आई तवारी दिस मायच्या पोटात जाण्याच्या आगुदर 'मऱ्याआईचा' गाडा गावच्या खाल्तं नेऊन सोडूया."[५] मुदरीकाबाईच्या सांगण्यावरून गाडा काढण्याचा दिवस ठरतो आणि ठरलेल्या दिवशी वाजंत्री सोबत भजन कीर्तन म्हणत गावाची रोगराईपासून सुटका होणार या हेतूने रीतिरिवाजाप्रमाणे सजलेला गाडा गावाच्या वेशीकडील रस्त्याच्या कडेला सोडला जातो आणि सर्वजण घरी येत असताना अचानक मुदरीका देवकरनीला ताप येतो. म्हणजेच मरीआईची प्रिय भक्त असणाऱ्या मुदरीका मायला चिकनगुन्या झाला होता. जणू काय देवालाच रोग झाला होता. त्यामुळे तिचे खोटे रूप गावाला कळते आणि गावाला संकटातून मुक्त करण्यासाठी काढलेल्या गाड्याचे हसू होते आणि एके दिवशी ग्रामसभेमध्ये चिकनगुन्या हा रोग अस्वच्छतेतून निर्माण होतो हे सांगितले जाते. त्यानंतर लोकांनी उपाययोजना म्हणून केलेल्या कृतीचा आणि आखलेल्या योजनांचा समावेश प्रस्तुत चिकनगुन्या या कथेच्या माध्यमातून लेखकाने स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

### ३. शिक्षण क्षेत्रातील फोलपणाचे मार्मिकपणे केलेले चित्रण :

शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र हा समाजाचा आरसाच असतो. पण आजच्या शिक्षण क्षेत्रामध्ये भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे निस्वार्थी भावनेने कार्य करणारे शिक्षक त्याला बळी पडताना दिसतात. त्यामुळे शिक्षणासारखे पवित्र क्षेत्र गढूळ होताना दिसते. याचेच चित्रण 'अन्याय' या कथेमध्ये लेखकाने अतिशय मार्मिकपणे केले आहे. 'अन्याय' या या कथेमध्ये डोंगरगाव या ठिकाणी संभाजी माने सारखा निस्वार्थी भावनेने शिक्षण प्रणालीचे काम करणारा शिक्षक मुख्याध्यापक या पदावर रूजू होतो आणि हळूहळू शिक्षण क्षेत्रामध्ये झालेला घोळ त्याच्या लक्षात येतो. शिक्षण क्षेत्र गढूळ होत आहे याची जाणीव होते. कारण शिक्षण सेवेत असणारे लांडगे गुरूजी आपला भाऊ जि.प. मेंबर असल्यामुळे तो आपली

मनमानी करत असतो. त्यामुळेच मातंग समाजातील विद्यार्थी प्रकाश लोंढेला परंपरागत व्यवसाय करण्यासाठी हालगी आणून दिली जाते. ही गोष्ट जेव्हा संभाजी माने गुरूजीला कळते तेव्हा त्यांना धक्का बसतो. ज्या हातांनी कोवळी पिढी घडवावयाची त्याच हाताने एखाद्या विद्यार्थ्याला पारंपरिक धंद्यात ढकलून त्याचे जीवन उद्ध्वस्त करायचे. त्यामुळे लांडगे गुरूजी हा शिक्षण क्षेत्राला कालिमा होता. ज्याने अनेक पिढ्या घडविण्याचा प्रयत्न करायचा त्यानेच परंपरागत व्यवसाय करणाऱ्या मांग जातीतील प्रकाश लोंढेला हलगी घेऊन देणे ही गोष्ट शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने वाईट होती. त्यामुळेच एखादी कोवळी पानगळ होऊ नये, या दृष्टिकोनातून मुख्याध्यापक संभाजी माने प्रकाश लोंढेला पुन्हा शाळेत येण्यास सांगतात. पण या गोष्टीमुळे गावातील सरपंचाला ही गोष्ट खटकते. मुख्याध्यापकाला अद्दल घडविण्यासाठी सरपंच लांडगे गुरूजीसह जाब विचारावयास येतात. तेव्हा संभाजी माने आपले मत व्यक्त करताना म्हणतो, "शाळेच्या प्रवाहात मुलांना आणणे हे माझे कर्तव्य आहे. माझेच कर्तव्य नाही, तर ते प्रत्येक शिक्षकाचे, देशाच्या प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. मी त्या एकट्या मुलास आणले नाही तर गावातील पाच-पन्नास मुलांना शाळेच्या प्रवाहात आणले आहे."[६] आणि आपल्या कार्यक्षम कर्तृत्वाने शाळेचा, गावचा परिसरच बदलून टाकतात पण अचानक अनपेक्षितपणे एक नोटीस येते. त्यामध्ये महाराष्ट्र जि.प. जिल्हा सेवा वर्तवणूक नियमानुसार १९६७ चा भंग केल्याची नोटीस असून त्यांना कामावरून कमी करण्यात येते.त्यामुळे मुख्याध्यापक संभाजी माने यांना धक्का बसतो. त्यांनी जो गुन्हा केला नाही. त्याच गुन्ह्याची शिक्षा त्यांना भोगावी लागणार असते. एका निस्वार्थी कार्यकर्तव्यदक्ष शिक्षकावर भ्रष्टाचाराच्या नावाखाली अन्याय केला जातो. 'कोवळी पानगळ' ही कथा शिक्षणासारख्या क्षेत्रावरती आधारीत आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षक हा प्रामाणिक, निस्वार्थी व भावी पिढीला घडविणारा एक जबाबदार देशाचा नागरिक असतो आणि याचे चित्रण या कथेमधून दिसून येते. वाईट मार्गाला लागलेला गावच्या पाटलाचा मुलगा रंगराव (रंग्या) याला शिक्षणाचे महत्त्व माहीत नसल्यामुळे तो इरबा तात्याच्या खिंडारात खतरूड मुलांना जमवून पैश्याचा खेळ खेळत असे. त्याचबरोबर तो विड्याही ओढत असे. ज्या वयात शिक्षण घेऊन एक आदर्श नागरिक घडावे

त्याच वयात वाईट नादाला लागलेल्या रंग्याला शिक्षणासारख्या पवित्र प्रवाहात आणण्यासाठी भीमराव पाटील गुरूजी प्रयत्न करतात. रंग्याला वाईट प्रवृत्तीपासून परावृत करण्याचा प्रयत्न करतात. पण खोटे बोलण्याची सवय लागलेला रंग्या आपल्या वडिलांना तिखट-मीठ लावून भीमराव गुरूजी वाईट कसे आहेत हे सांगतो. त्यामुळे रंग्याच्या वडिलांना ही गोष्ट पटते आणि तो गुरूजींना घडलेल्या घटनेचा जाब विचारावयास येतात. इरेला पेटलेल्या पाटलाला बघून गुरुजी नमते घेतात आणि आपली काहीही चुक नसताना त्या मुंजाजी पाटलाचे पाय धरतात. यावर रंग्याच्या वडिलांना आपली चूक समजते आणि म्हणतात, "मास्तर, मला माफ करा. म्या तुमच्यावाणी माणसाला शिव्या दिल्या."[७] आणि ज्या हातात गुरूजींना मारण्यासाठी बुट घेतलेला असतो. त्याच बुटाने रंग्याला मारायला सुरूवात करतात. तेव्हा खरे काय घडले हे सर्व रंग्या सर्वांना सांगतो त्यामुळे रंग्याची शाळा बंद करण्याचा निर्णय रंग्याचे वडील घेतात. पण क्षणात गुरूजींसारख्या व्यक्तीच्या मनात येते की, ही कोवळी पानगळ होऊ द्यावयाची नाही आणि रंग्याला पुन्हा शाळेत घेऊन यायच यावरून समाजामध्ये शिक्षणाविषयी उदासिनता आणि त्यावरती गुरूजींनी सुचविलेला उपाय यावरून शिक्षणाची अवस्था प्रत्ययास येते.

### ४. नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेली सासुरवाशीनीची मनस्थिती :

'मोहर' या कथेमध्ये सासर-माहेर यांना जोडणारी जिजाबाई हिला सासूचा खूप जाच होत असल्यामुळे ती असुरक्षित होती. ती जरी सासरी वावरत असली तरी तिचे मन मोहरामध्ये गुंतून राहत असे. अचानक एक दिवस भूकंप येतो आणि सर्वच ठिकाणी त्याचे हादरे जाणवू लागतात. गावातील लोक ही मोठ्याने ओरडतात यातील एकजण म्हणतो, "लोक हो ऽ गावात भूकंप व्होत आये रं... ? तुम्ही जल्दीनं घराच्याबाहेर आंगणात येऊन थांबा रं...? घराच्या दरवाज्याखाली नसती पलंग-खाटं खाली जाऊन बसा. नाय तर फुकट हाकनाक मरच्याल रं...?"[८] या भूकंपाच्या धक्याने जिजाबाई खूप घाबरते आणि तिचे मन माहेराकडे ओढ घेते, कारण गेल्यावर्षी जेव्हा ती माहेरी गेली होती, तेव्हा तिच्या आई-वडिलांनी भूकंपाला घाबरून आपले भितियुक्त मन तिच्यापुढे रिकामे केले होते. सासरच्या लोकांना भूकंपाचे गांभीर्य नसल्यामुळे तिचे मन माहेरी जाऊन परत येऊ लागले.

आणि अशा मनस्थितीत अचानक आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरून बातमी येते ती अशी, "आकाशवाणी पुणे केंद्र ठळूख बातम्या... ३० सप्टेंबर, १९९३ रोजी रात्री पहाटे ३ वाजून ५६ मिनिटांनी झालेल्या ६ रिक्टर स्केलच्या धरणीकंपाने लातूर जिल्ह्यातील डोंगरी गावातील ५00 लोक जमिनित गाढले गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.?"[९] या बातमीमुळे जिजाबाई अक्षरश: उद्ध्वस्त होते आणि रडू लागते. या घटनेमुळे तिला अन्नही जात नाही. सासू पार्वतीबाई तिला जेवण्याचा आग्रह करत म्हणते, "आगं पोरी, तुझ्या माहेरचा चिरबंदी वाडा हाय. तवा तू कायबी घोर करू नगस. त्यांना भूकंपाची कायबी भीती न्हाय ग ?"[१०] असा खोटा धीर देऊन जिजाबाईला माहेरी पाठवते. बसगाडी माहेरच्या दिशेने धावू लागते पण तिचे मन क्षणात माहेरातील आपल्या नातेवाईकांना भेटून येऊ लागते. जेव्हा बस डोंगरी गावच्या पाटीवर थांबते तेव्हा तिला आपल्या गावाला यात्रेचे स्वरूप आले आहे याची जाणीव होते. तिच्या माहेरचा वाडा ढासळलेला असतो. त्या गावाला जणू स्मशानाचे रूप प्राप्त झालेले असते. ज्या माहेरात ती लहानाची मोठी झालेली असते तेच माहेर धरणीकंपाच्या तांडवनृत्यामुळे उद्ध्वस्त होते. दोन दिवस फिरल्यानंतर देखील तिला तिच्या नात्यातील कोणीच भेटत नाही. सरकारी दवाखान्याच्या समोर टाकलेल्या प्रत्येक प्रेताला हे माझ्या आईचे, वडिलांचे, भावाचे प्रेत आहे असे समजून ती वेड्यागत झाली होती. चार दिवस झाले तरी तिला तिच्या नात्यातले कोणीच भेटत नाही मात्र पाचव्या दिवशी ती मोठ्या निर्धाराने उठते आणि वडिलांच्या वाड्याचा झालेल्या ढिगाऱ्याकडे पाहत म्हणते, "माऽय, आता म्या परत चालेव ग ? बापू, आता म्या कायमचं चालेव...! भाऊ र, तू मला दिवाळीला बोलावणी घेऊन येणार व्हतास बरीक तू मला न्यायला येण्याच्या आगुदरच म्याच तुमाला भेटायला आलेव दादा रं. म्या या धरणीमाय फाटलेल्या माहेराला कधीच येणार न्हाय की रं... ? आर भाऊ, आता म्या कुणाला राखी बांधायला येऊ रं ? आरं, तुम्ही मला कोणीच कसं बोलत न्हाव रं... बाबाऽ? म्या तुमचा असा कसा मोठा गुन्हा केल्ते म्हणून मला एकटीला सोडूनशान गेलाव रं... तुमी ?"[११] अशा प्रकारच्या अनेक आठवणी मनाशी घट्ट आवळून दु:खी अंत:करनाने ती सासरची वाट धरते. पण गाडीत बसल्यावर तिचे मन पुन्हा बोलू लागते की, "आगं ऽ तू कुठं

निघालीस ? तू पुन्हा त्या नरकात जाऊन मरण यातना भोगणार आहेस का ? तिथं तुझं कोण आहे ? धर्मानं आणि संस्कृतीनं बांधून दिलेला 'बिनकामाचा नवरा...! तुला रोज उपाशी ठेवून माहेरची इदरणी करणारी सासू, तुझं सौंदर्य तुला शाप आहे का ? तुझ्या चारित्र्यावर संशय घेऊन तुला जगणं असह्य करणारे माय लेकरं...! आगं, त्या नरखं यातना भोगण्यापरीस माहेरात ज्याला कोणी उरलं नाही त्याची सेवा करीत जगणं बेहत्तर आहे."[१२] असा विचार करून ती परत माहेरी येऊन रूग्णांच्या मदतीसाठी नर्स बनून ती सुख-दु:ख विसरून गावाच्या माहेरच्या माणसांची सेवा करते.

## ५. पुरुषी अत्याचाराला बळी पडलेल्या स्त्रीचे चित्रण :

आजच्या आधुनिक काळात स्त्री-पुरुष समानता असा कायदा केला असला तरी समाजामध्ये स्त्रीला दुय्यम स्थान देऊ केले आहे. स्त्रीचं जीवन म्हणजे एक संकटाची मालिकाच असते. समाज तिच्याकडे एक उपभोगाची वस्तू म्हणूनच पाहते, तिच्या शीलाच रक्षण हेच तिचे सर्वस्व असते आणि त्याच गोष्टीवर एखादी वाईट नजर पडली तर तिच्यासमोर मोठे संकट उभे राहते आणि हाच विषय लेखकाने 'आत्महत्या' या कथेत हाताळला आहे. देवा धर्माच्या नावाखाली लुबाडणारा भोंदू आर्यदेव महाराज गावात येतो. गावातील लोकांना आपल्या मधुर शब्दांनी आपलेसे करतो. गावही त्याला डोक्यावर घेतो. पण माणूसकी नसणारा आर्यदेव महाराज आपली नीच प्रवृत्तीचे दर्शन घडवितो. परंपरागत चालत आलेला फुलांचा (माळ्याचा) व्यवसाय करणाऱ्या सुमनवर वाईट नजर टाकतो. सुमनलाही त्याची वाईट नजर असल्याचे जाणवते. ती आपल्या आईलाही ही गोष्ट सांगते. पण आंधळेपणाने विश्वास ठेवणारी आई सुमनलाच आर्यदेव महाराज चांगला असल्याचे सांगते. एक दिवस सुमन दिवाळीसाठी लागणारी फुले आणण्यासाठी नेहमीप्रमाणे शिवमंदिराजवळ असलेल्या बागेत जाते, आणि फुले वेचू लागते. तेवढ्यात आर्यदेव महाराज तिला देवाला फुले वाहूण निरंजन लावावयास सांगतो. घाबरलेली सुमन मंदिरात दिवा लावण्यास वाकली असता तारूण्यात आलेल्या सुंदर रूपवान सुमनला पाहताच आर्यदेव महाराजामधील हैवान जागा होतो आणि मांजराने उंदारावरती, वाघाने हरिणीवरती झडप घालावी त्याप्रमाणे महाराज सुमनवर झडप

घालतो आणि सुमनवर पाशवी बलात्कार करतो. निष्पाप, निरागस सुमन या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी प्रतिकार करते. तिचे रडणे, तडफडणे पाहून नीच प्रवृत्तीचा आर्यदेव महाराज म्हणतो, "बालिके, तुमच्यासारख्या दांभिक पोरी प्रेमाला विरोध करतात... मनाची, भावनेची हत्या करतात...त्यांना वासना कळत नाही...त्यांना प्रेमग्रंथ वाचता येत नाही. म्हणून तुमच्यासारख्या इंद्रिय दमन करणाऱ्या पोरी शारीरिक सुख उपभोगण्याऐवजी त्याची हत्या करून स्वत: मनालाही विकृत करून टाकतात."[१३] सुमनसारख्या कोवळ्या कळीचे अस्तित्वच संपून जाते. तिची किंकाळी, तिचा प्रतिकार हा मंदिराच्या काळ्या गाभाऱ्यातच दडपला जातो. प्रतिकार करणाऱ्या सुमनला विवस्त्र, अशक्त झाल्यामुळे तिला उभे राहता येत नव्हते. कशी तरी स्वत:ला सावरीत ती घरी येण्यास निघते. पण स्त्री उपभोगण्यासाठी आसुसलेला आर्यदेव महाराज आपले नीच कार्य कुणालाही कळता कामा नये. म्हणून तो सुमनला धमकावतो. सुमनला या घटनेपासून तिच्या पोटात नीच प्रवृत्तीच्या आर्यदेव महाराजाचे पाप वाढत असते. या सर्व परिस्थिती पुढे हरलेली सुमन स्वत:ला आत्महत्येच्या माध्यमातून संपवते. कारण गावाच्या दृष्टीने चांगला, गाजलेला आर्यदेव महाराजाविरूद्ध ती काहीही करू शकणार नसते. पण आर्यदेव महाराजाचे पितळ पोलिसांच्या माध्यमातून उघड होते. कारण त्याने आत्तापर्यंत सतरा महिलांवर बलात्कार केलेला असतो. त्यामुळे पोलिसांना हवा असणारा गुन्हेगार नारायण कोकणीकर त्यांना सापडतो जिवंतपणी जीवनाची लढाई हरलेली सुमन मृत्यूनंतर मात्र ती लढाई जिंकते.

## ६.मुक्या प्राण्याच्या वेदनेचे बोलके चित्रण :

ग्रामीण भागामध्ये शेतकरी या घटकाला फार महत्त्व असते आणि शेतकरी म्हटला की, त्यांच्या जीवनाशी प्राण्यांचे विश्व जोडले जाते, शेतकऱ्याची जमीन ही मुक्या प्राण्यावर अवलंबून असते. या मुक्या प्राण्याचे चित्रण 'बैलपोळा' या कथेत केले आहे. पोपटराव पवार-पाटील याच्या शेतीसाठी वर्षानुवर्षे मदत करणारा सर्जा-राजा या बैलजोडीमुळे त्यांना बरे दिवस आले होते. त्यामुळे या ऋणातून थोडेफार मुक्त होण्यासाठी बैलपोळा साजरा करावयाचे ठरवतात. पोपटराव पाटलाच्या दृष्टीने सर्जा-राजा हे त्याच्यासाठी दैवत होती.

त्यामुळेच आपला गडी शिवाजी गोरखे याच्या मदतीने बैलपोळ्याच्या तयारीला लागतात. मागील वर्षी त्यांची बैलजोडी ही नामवंत, नावजलेली जोडी होती. या बैलजोडीनेच त्यांना एक मानसन्मान प्राप्त करून दिला होता. त्यांच्या चांगल्या वागणूकीबद्दल त्यांना गावातील लोकांनी सरपंचपद बहाल केले होते. व पोळ्याचा मानही दिला गेला होता. परंतु पूर्वापार चालत आलेल्या वैमन्यासामुळे गावातील चिमणराव पाटील सूड घेण्याच्या उद्देशाने पोपटराव पाटलावर हल्ला करतो. त्याचवेळी सर्जा आपली दावण सोडून आपल्या मालकाला वाचविण्याचा प्रयत्न करतो. पण त्यालाही मृत्यूला आपलेसे करावे लागते. या सर्व घटनेमुळे राजा, आपला सहकारी मित्र सर्जा मेल्याने तो अस्वस्थ झाला होता. अन्न-पाणी त्याने वर्ज्य केले असल्यामुळे तो खंगत चालला होता आणि अचानक पोळ्याच्या दिवशी बैलाच्या गळ्यातील घुंगरमाळांच्या आवाजाने राजा मोठ्याने डिरक ऽ डिरक ऽऽ डिरक ऽऽऽ अशी हुंकारी देतो. जणू काय त्याच्या अंगात विद्युलता संचारते. त्यामुळे तो इतर सजविलेल्या बैलांबरोबर हांबरत मालकाच्या बैलात येऊन मिसळतो आणि मंदिराभोवती एक फेरी पूर्ण करून येताक्षणी राजा बिथरतो आणि मोठी डरकाळी फोडतो. त्यामुळे चिमणराव पाटील राजावर काठी उगारतो. त्याचक्षणी राजा चिमणराव पाटलाला धडक देतो. त्यासरशी चिमणराव खाली पडतो. व स्वत:ला सावरू लागतो. व स्वत:चा जीव वाचविण्यासाठी तेथून पळ काढण्याच प्रयत्न करतो. पण पळताना अचानक पाय अडकून तो खाली पडतो. राजाच्या मनात खदखदणारी वेदना आणि मालक व आपला सहकारी याचा झालेला मृत्यू या घटनेमुळे राजा आपल्या टापाखाली चिमणरावाला तुडवतो आणि या बैलाच्या धडक्यात चिमणराव पाटलाचा मृत्यू होतो. त्यामुळे पोळा उधळला जातो. राजाही परत आपल्या घराकडे येऊन पोहोचतो आणि डोळ्यामध्ये अश्रू आणून वाडा निरखू लागतो. पण क्षणात ज्या ठिकाणी मालकाला पुरलेले असते. त्या ठिकाणी जातो. गौरच्या भोवती फेरी मारून मोठ्याने डरकाळी फोडून अचानक खाली कोसळतो. पण त्याला मारण्यासाठी त्याच्या मागे लागलेल्या लोकांना पोपटराव पाटलाच्या मृत्यूचे गुढ समजते. अशाप्रकारे मुक्या असणाऱ्या राजाने स्वत: मृत्यूला सामोरे जाऊन आपल्या मालकाला व सहकारी मित्र सर्जा यांना न्याय देण्याचा यशस्वी प्रयत्न करतो.

## ७. लेखकाच्या आयुष्यात घडलेल्या दु:खद घटनेचे चित्रण :

'जखम' या कथेच्या माध्यमातून स्वत: लेखक विलास सिंदगीकरांनी आपल्या आयुष्यात घडलेल्या दु:खद घटनेला शब्दांच्या माध्यमातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकाचे वडील बंधू केशव अण्णा हे मुंबईला बिगारी कामाला होते. अचानक त्यांना कावीळ झाल्याची बातमी लेखकाला समजते. गावाकडे कावीळ हा आजार बरा होतो. या विचारांनी केशव अण्णा गावाकडे आले होते. पण कावीळ या आजाराचे शरीरातील प्रमाण इतके वाढले होते की, त्यामुळे केशव भाऊला अन्न-पाणी काहीच पचत नसे. शिवण खेडचे खाजगी डॉक्टर हा कावीळीवरील गुणकारी औषध देणारा म्हणून प्रसिद्ध होतो. कारण त्याने मरायला टेकलेल्या रूग्णांना बरे केलेले होते. म्हणूनच त्याची ख्याती ऐकून लेखक केशव अण्णाला घेऊन शिवणखेडला जातात. डॉक्टर केशव अण्णाला तपासतात आणि म्हणतात, "मरीज शेवटच्या स्टेजला आहे. त्याने पत वेळेवर पाळली, तर मग तो नीट होईल. पण दारू प्यायची नाही. कावीळ झालेल्यानं दारू पिणं घातक असते. कावीळ झाल्यावर दारू पेलेला माणूस कधीच वाचत नाही."[१४] लेखकाच्या आग्रहाखातर डॉक्टरांनी इंजेक्शन व गोळ्या दिल्या पण अण्णाची तब्बेत जास्तच बिघडली. त्यामुळे लेखक जळकोटच्या सिंदगीचे डॉक्टर तानाजी चंदावर यांचे नाव ऐकून केशव अण्णाला तिकडे घेऊन जातात. पण कोणत्याही तपासणी मशिनची सोय नसल्यामुळे डॉक्टर त्यांना खाजगी दवाखान्यात नेण्याचे सुचवितात. लेखक ही पैशांची जुळवाजुळव करून केशव अण्णाला नांदेडच्या गुरूगोविंद सिंघजी सरकारी दवाखान्यात दाखल करतात. पण तेथेही केशव अण्णा कडे दुर्लक्ष केले जाते. नंतर अथक प्रयत्नांनी भाऊवर उपचार सुरू होतात. पण सिरियस केस असल्यामुळे केशव अण्णा ही उपचारांना प्रतिसाद देऊ शकत नसल्यामुळे अचानक अण्णा पंख कापलेल्या पाखरासारखे धडपडू लागतो. त्याची तब्बेत खूपच वाईट होते आणि पाहताक्षणी केशव अण्णां जगाचा निरोप घेतात. लेखकावर दु:खाचा डोंगर कोसळतो. लेखकाच्या आयुष्यात घडलेल्या दु:खद घटनेचा प्रवास वाचकांना सुन्न करून टाकल्याशिवाय राहत नाही.

## ८. भूमिहीन मजूराचे चित्रण :

मोर्चा म्हटलं की, समोर उभा राहतो तो आपला हक्क मिळविण्यासाठी जीवन जगताना निर्माण झालेल्या समस्या सोडविण्यासाठी एकजुटीने एकत्रित आलेला जनसमुदाय होय. 'मोरच्या' या कथेत पुढारी लोकांच्या स्वार्थी प्रवृत्तीला बळी पडलेल्या बळी मोरे या भूमिहीन मजुराचे चित्रण केले आहे. वीस वर्षापासून अण्णा (रंगराव सखाराम पाटील) याच्या हातात संपूर्ण गाव होता त्याच्याशिवाय गावातील कोणतीही गोष्ट घडत नसे. तालुक्याला तहसील कार्यालयावर शेतकरी-कष्टकरी यांच्या मालाला किंमत मिळावी म्हणून कामगारांचा मोर्चा निघणार असतो. त्यासाठी अण्णांनी बळीला आदल्या दिवशी बोलावणे पाठविलेले असते. बळी मोरे हा वडार जातीतील असल्यामुळे दगडफोड्या हा त्याचा व्यवसाय होता. दगड-धोंडे फोडून आपला संसार चालवित होता. पण स्वत:चे आखिव काम बाजूला सारून व अण्णांच्या शब्दाला मान देऊन तो अण्णाच्या पार्टीच्या वतीने मोर्चामध्ये सहभागी होतो. पण या मोर्चा काढण्याच्या पाठीमागे अण्णाचे स्वार्थी राजकारण आहे. याची जाणीव बळीला नसते. मोर्चा जबरदस्त निघाला तरच उद्या पक्षाचे पुढारी अण्णाच्या आमदारकीच्या तिकीटाबद्दल विचार करणार होते. त्यासाठीच आपले वर्चस्व दाखवूण देण्यासाठी मोर्चा जंगी काढावयाचे ठरवितात आणि त्यामध्ये बळीसारख्या तरुणाला घोषणेबाजीसाठी पुढाकार करण्यास सांगतात. त्यानुसार ठरलेल्या दिवशी मोठ-मोठ्या घोषणांनी शेतकरी मोर्चा प्रचंड लोकसमूहाने निघतो. आणि अचानक अण्णासाहेब पाटलाच्या भाषणानंतर नेते हिंदूराव नामजोशी साहेबाच्या भाषणाला सुरुवात होते आणि त्या भाषणाने लोकांची मने पेटवली जातात. लोकांच्या भावनेचा उद्रेक होतो. त्यामुळे पोलिसांच्या बंदुकीच्या फैरी हवेत झाडल्या जातात. मोर्चामध्ये निर्माण झालेल्या स्फोटाने, गोंधळाने पोलिसांनी केलेल्या गोळ्यांच्या वर्षावामुळे मोर्चामध्ये म्होरक्या असणारा बळी मोरे जखमी होतो आणि विशेष म्हणजे तो अण्णासाहेबाच्या गावचा एकमेव माणूस या परिस्थितीत सापडलेला असतो. त्याला गोळ्या लागल्यामुळे खूप रक्तही जाते. त्यामुळे त्याची तब्येत खूपच नाजूक बनते. दवाखान्यात

देखील डॉक्टर त्याच्याकडे दुर्लक्ष करतात. आणि अचानक मिडियाचे लोक गर्दी करून बळी मोरेला प्रश्न विचारावयास सुरुवात करतात. ती अशी

"तुमची किती एक्कर जमीन ओलिताखाली आहे ?

"तुमी काय बोलता ते मला कायबी कळत नाय बघा."

"तुम्हाला मळ्याची शेती किती एकर आहे ? तुम्ही कापूस, ऊस, केळी अशी कोणकोणती पिके घेता ? यावर बळी मोरे म्हणतो "आवो सायब, तुमी कशाचा ऊस आन केळी घेऊन बसलाब जी. मालक, मला शेतीच नाय जी! म्या कट मजूरदार हाय बघा. म्या धोंडफोड्याचं काम करतो. ते लागलं नाय त्या दिसी कुणाच्याबी शेतात लागेल ते काम करताव बघा. म्या शेतमजूर भूमिहीन हाव, सायब ? मला सीपीएवडी बी शेती नाय बघा."१५ त्याच्या या उत्तरावर पत्रकारांनी पुन्हा प्रश्न केला की, तुम्हाला शेती नाही तर या मोर्चात सहभागी का झालात ? त्यावर बळी मोरेचे उत्तर अस्वस्थ करते, "आवो सायब, म्या पन्नास रूपये रोजगार देतो. आन हॉटेलात खिचडी खायला घालतो मनल्यानं मोरच्याला आलाव बघा."१६ आणि बघताक्षणी बळीची तब्बेत बिघडते आणि भूमिहीन बळी मोरेला शेतकरी मोर्चामध्ये प्राणाला मुकावे लागते.

## ९. पोलिस खात्यातील माणुसकीचे दर्शन :

'वर्दीतील माणूस' या कथेमधून लेखकाने पोलिस खात्यातील माणुसकीचे दर्शन घडविलेले आहे. नवोदित लेखक विजय पवार हा नांदेड येथे भरलेल्या नवोदित मराठी साहित्य संमेलनात सहभागी होतो. तीन दिवसाचे साहित्य संमेलन संपल्यानंतर विजय पवार परतीच्या वाटेला निघाला असता अचानक परभणीला मस्जिद मध्ये झालेल्या बॉम्बस्फोटामुळे नांदेडच्या जुना मोंढा आईतवारा भागात जमावबंदी चालू असल्यामुळे त्या भागाला स्मशानाचे रूप प्राप्त झाले होते. पण दोन तासानंतर थोडा कर्फ्यु शिथील झाल्यामुळे लातूर फाट्यापासून पुढे गाड्या चालू असल्यामुळे लेखक विजय पवाराने लातूर फाट्यापर्यंत जाण्यासाठी रिक्षा केली पण रिक्षा पुढे गेलीच नाही. कारण लोक बेभाम होऊन रस्त्यावरील वाहनांची तोडफोड करीत होते. या दंगलीमध्ये विजय पवार सापडल्यामुळे स्वत:ला वाचविण्यासाठी तो मस्जिदचा

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आश्रय घेतो. पण मस्जिदीत आलेल्या पठानांनी विजयला मस्जिदीच्या बाहेर ढकलून दिल्यामुळे विजय पवारला दु:खापत होते. संचारबंदी चालू असल्यामुळे पोलीस ही त्याला गराडा घालून दोन-चार दांडक्याचा मार देऊन त्याची झडती घेतात. पोलिसांनी मस्जिदीमध्ये शिरण्याचे कारण विचारता आपला जीव वाचविण्यासाठी शिरलो होतो असे तो उत्तर देतो. पण त्याचे काहीही न ऐकता फौजदाराच्या सांगण्यावरून त्याला जबरदस्तीने जीपमध्ये टाकले जाते. त्यामुळे विजय पवारची अवस्था खूपच नाजूक बनते. त्यामध्ये भर म्हणून फौजदार साहेब त्याला आत्तापर्यंत कोणकोणत्या दंगलीत सहभागी झाला होतास ? हा प्रश्न विचारताच विजय पवार गोंधळतो आणि उत्तर देताना म्हणतो, "अहो साहेब, दंगल पेटवायला मी काय गुन्हेगार नाही ? मी एक प्रामाणिक शिक्षक आहे."[१७] त्यावर त्याला ओळखीचे कोण-कोण आहे असे विचारता, तो म्हणतो नांदेड पोलीस परिक्षेत्रात माझा मित्र जी.बी.शिंदे फौजदार आहे. पण तो बरीच वर्ष झाली त्याची माझी भेट झालेली नाही. त्यावर फौजदार साहेबांनी विजयला सोडून देण्याबद्दल मोबदला काय देणार ? असा प्रश्न विचारता विजय धाडस करून म्हणतो, "अहो साहेब, तुम्ही लोक म्हणजे मढ्यावरच्या टाळूवरची लोणी खाणाऱ्या ढोमकावळ्यासारखे असता बघा... खऱ्या गुन्हेगारांना सोडून देवून गरीब गाईला काठ्या घातल्यासारख्या माझ्यासारख्या गरीबावर काठ्या-लाठ्या घालता. अन् त्याला पकडून त्याच्यावर केस करून मोकळे होता... महिन्यातून कांही केस तुम्हाला कादपत्री दाखवावे लागते ना ? कारण गरीब माणसं तुमच काहीही वाकडं करू शकत नाही... आणि त्याने काही तक्रार केली, तर त्याच्या करण्याने तुमचा बाल बाका होत नसतो. पावसाने झोडपले आणि राजाने मारले, तर गरीबांनी दाद कोणाकडे मागायची ?"[१८] पण फौजदार साहेब त्याच्या या उत्तराला कोणतीच प्रतिक्रिया न देता चहा पिण्याचा आग्रह करतो आणि विजय पवारला आश्चर्याचा धक्का देतात. तो म्हणजे महाविद्यालयीन असणारा मित्र जो फौजदार झालेला आहे तो मीच जी.बी.शिंदे होय. त्यावर विजय पवार म्हणतो तू माणूस आहेस की सैतान त्यावर आपल्यातल्या माणुसकीचे दर्शन घडविताना फौजदार म्हणतो, "आरे विजय, मी इथे फौजदार आहे. मी पोलिसांचा बॉस आहे. त्यांच्यासमोर कांही बोलू नकोस? मी सैतानातील माणूस आहे म्हणून गावाकडे जायच्या रस्त्यावर

घेऊन आलोय नाहीतर दंगलीत हाकनाक मेला आसतास ना ? मी तुला बरोबर ओळखून आणलं का नाही."[१९] विजयला आपला जुना मित्र भेटल्याने व त्याने आपली सुटका केल्यामुळे त्याला खूप आनंद होतो. फौजदार जी.बी.शिंदे माणुसकीबरोबर मैत्रिला ही जागला होता.

## 'उरतंड' मधील व्यक्तिरेखा :

'उतरंड' या कथासंग्रहातील व्यक्तिरेखा या वेगवेगळ्या स्वभावाच्या असल्याचे दिसून येतात. लेखकाच्या अनुभवदृष्टीतून व्यक्तिरेखा प्रकट झालेल्या दिसतात. कथेच्या मर्यादित अवकाशामध्ये व्यक्तिरेखा साकार झालेल्या आहेत. कथांमधील प्रत्येक व्यक्ती आपल्या वाट्याला आलेले जीवन जगताना दिसतात.

## पुरुष व्यक्तिरेखा :

### १. आनंद जाधव :

'उतरंड' या कथेतील दलित मातंग समाजाचा आनंद जाधव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक प्रभावामुळे प्रभावित होऊन धर्मांतर चळवळीमध्ये स्वत:ला झोकून देतो. व बौद्ध धर्म स्वीकारतो. परिवर्तनीय विचारसरणीने वाटचाल करणारा आनंद जाधव हिंदू संस्कृतीमधील रूढी-परंपरांचा त्याग करतो, "देवाला सर्व माणसं सारखे आसतात. मग आपणच का गावकुसाबाहेरचं जीणं जगत आहोत ? ज्या देवाला तोंड, नाक, डोळे नाहीत. शेंदूर फासून ठेवलेले दगड-धोंडे आपले देव आहेत. ज्याच्या अंगावर कुत्रं येवून विधी करून जाते, हे सुद्धा कळत नाही, हे कसले देव?"[२०] अशा विचारसरणीने वाटचाल करणारा आनंद जाधव मात्र आपल्या मुलीच्या विवाहासंदर्भात त्याला वारंवार जाती-धर्माचा उल्लेख करावा लागतो. पण ऐवढे करून देखील त्याने केलेल्या धर्मांतरामुळे त्याला अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. त्याच्या मुलीचा विवाह कोठेही जुळून येत नसल्यामुळे तो निराश होतो. पण जिद्द सोडत नाही. पण तरीही तो स्वत:शीच विचार करू लागतो की, "महार समाजाने बौद्ध धर्माचा स्वीकार केला असला तरी त्यांनीही मातंग समाजातील धर्मांतरीत बौद्ध झाल्याच्या कुटुंबातील मुली केल्या नाहीत. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलं होत की जोपर्यंत या भारत देशातील वेगवेगळ्या जाती-जातीत रोटी-बेटी व्यवहार होणार नाहीत. तोपर्यंत सामाजिक

परिवर्तन होणे शक्य नाही."[२१] अशा प्रकारे विचार करणारा आनंद जाधव आपल्या जातीयतेची उतरंड मोडून परिवर्तनाची लढाई जिंकतो.

**२. राहूल :**

'उतरंड' या शीर्षक कथेतील राहूल ही व्यक्ती परिवर्तनाच्या वाटेने वाटचाल करताना दिसते. उच्च शिक्षण असणाऱ्या राहूलचे जेव्हा धर्मांतर नसलेल्या मातंग समाजातील रूपालीशी त्याच्या मनाविरूद्ध विवाह केला जातो. पण त्याची पत्नी जेव्हा देवाची पूजा करते तेव्हा तो तिला विरोध करतो. त्यामुळे त्या दोघांमध्ये वैचारिक मतभेद झाल्यामुळे ती माहेरी निघून जाते. ती परत कधीही न येण्यासाठी. पण अचानक अनपेक्षित घटना घडते. त्यामध्ये भीमराव कुलकर्णीची सून अनुराधाला आपल्या पतीच्या रोगाबद्दल जेव्हा समजते तेव्हा ती घरातून पलायन करते आणि थेट गावकुसाबाहेरील असणाऱ्या राहूलच्या घरी येते. ती राहूलच्या प्रेमात पडते आणि राहूलशी विवाह करण्याचा निश्चय करते. राहूलही तिच्या जातीची पर्वा न करता अनुराधाला पत्नी म्हणून स्वीकारण्यास तयार होतो.

**३. बळी मोरे :**

'मोरच्या' कथेतील बळी मोरे ही व्यक्ती परिस्थितीपुढे हतबल होताना दिसते. कारण भूमिहीन असणारा बळी हा वडाराचे काम करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत असतो, "बळी तरणाबांड देखणा पोरगा होता. रंगानं गडद काळा होता. पण उमदा दिसत असे. तो उंचीला साडेपाच-सहा फूट चेहऱ्याला शोभेल असं नाक होतं. मात्र त्याचा पहाडी आवाज ध्यान्यात राहण्यासारखा होता. बळीला बोलण्यासाठी माईकची गरज भासत नव्हती. तो मोठ्याने घोषणा देऊ लागला की, परिसर त्याच्या आवाजानं दुमदुमून जायचा. म्हणून बळीला घेऊन गेल्याशिवाय कुठलाही मोर्चा यशस्वी होत नव्हता. त्यामुळे त्याला प्रत्येक मोर्चाला सोबत घेऊन जात असत."[२२] असा हा प्रामाणिक, निस्वार्थी, साधा सरळ असणारा बळी मात्र गावातील पुढाऱ्याच्या हातातले खेळणे बनतो व एका अनपेक्षित परिस्थितीमुळे स्वत: मृत्यूला आपलेसे करतो.

### ४. संभाजी माने गुरूजी :

'अन्याय' या कथेमधील शैक्षणिक क्षेत्राविषयी आत्मियता असणारे संभाजी माने गुरुजी मुलांना शालेय प्रवाहात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न करताना दिसतात. परंपरागत जाती व्यवस्थेने लादली गेलेली कामे करणाऱ्या प्रकाश लोंढे या मुलाला शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करतात. कारण शाळेतील लांडगे गुरूजी आपल्या भावाच्या पदाचा गैरवापर करून घेत असतो. त्याचप्रमाणे तो प्रकाश लोंढेला सातशे रूपयाची हालगी देऊन शिक्षणापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करतो त्यामुळे संभाजी माने गुरुजी स्वत:शीच खिन्न होऊन म्हणतात, "शाळेवर वेळेत न येण... मुलांना शाळेत न शिकविता पगार उचलणे...एक कोवळी पानगळ होऊ देणे... त्या निष्पाप जिवास पारंपरिक जातीय व्यवसायात अडकवून त्याचे जीवन उद्ध्वस्त करणे... हा सुद्धा एक प्रकारचा भ्रष्टाचारच आहे."[२३] आणि या भ्रष्टाचाराला विरोध करणाऱ्या संभाजी माने गुरुजींच्यावर कोणताही गुन्हा नसताना देखील गावातील मंडळी त्याच्यावर खोटा आरोप दाखल करतात. त्यामुळे तो अस्वस्थ होतो. कारण त्याच्यावर अन्याय झालेला असतो.

### ५.आर्यदेव महाराज :

'आत्महत्या' या कथेतील आर्यदेव महाराज ही समाजाला काळिमा फासणारी व्यक्ती. तीस-पस्तीस वयाचा भोंदू, लिंगपिसाट वृत्तीचा आर्यदेव महाराज गावाला जिंकून घेतो. गावातील लोक ही त्याला 'भोलेनाथ' या नावाने संबोधतात पण मंदिराशेजारी फुले आणण्यासाठी आलेल्या सुमनला पाहताच त्याच्यातील हैवान जागा होतो. व तो सुमनवर पाशवी बलात्कार करतो. पण जेव्हा त्याचे पितळ उघड होते तेव्हा त्याचे खरे रूप गावासमोर येते कारण आर्यदेव महाराज असणारा नारायण कोकणीकर याने पुण्याहून आलेल्या एका शिक्षकेवर बलात्कार करून फरार झालेला असतो. आत्तापर्यंत त्याने सतरा महिलांवर बलात्कार केलेले असतात. त्यामुळे त्याच्या क्रुरकर्माचा शिक्षा म्हणून पोलीस त्याला पकडून नेतात. त्यावेळी लोक त्याला फाशीची शिक्षा व्हावी अशी इच्छा व्यक्त करतात.

### ६. रंग्या (रंगराव) :

'कोवळी पानगळ' या कथेतील रंग्या ही व्यक्तिरेखा वेगळ्या अंगाने वाटचाल करताना दिसते. गावच्या मुंजाजी पाटलाचा रंग्या हा उडानटप्पू स्वभावाचा मुलगा असतो. शिक्षणासंबंधी त्याची नापसंती असते. त्यामुळे तो लहान वयातच वाईट मार्गाला लागलेला असतो. खोटारड्या स्वभावाच रंग्या वर्गातील भीमराव पाटील गुरूजींना आपल्या वडिलांसमोर खोटे ठरवतो. पण जेव्हा त्याचा खोटारडेपणा उघडकीस येतो तेव्हा मात्र त्याचे वडील त्याची शाळा बंद करण्याचा निर्णय घेतात.

### ७. प्रकाश लोंढे :

'अन्याय' या कथेतील प्रकाश लोंढे हा दलित समाजातील सुमनबाय लोंढेचा मुलगा असतो. तो परंपरागत चालत आलेल्या मांगकीच्या व्यवसायात तरबेज असतो. गावातील कोणत्याही समारंभात तो हालगी वाजवित असे. त्याचप्रमाणे तो गावामधील घडणाऱ्या गोष्टीची वार्ता, माहिती (डांगोरी) तो हालगीच्या सहाय्याने देत असे पण त्याच्या आयुष्यात संभाजी माने गुरूजींच्या येण्याने त्यांच्या आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळते.

### गौण पुरुष व्यक्तिरेखा :

१. 'बैलपोळा' या कथेतील पोपटराव पवार-पाटील हा शेतकरी असतो. गावामध्ये त्याला मानाचे स्थान देऊ केलेले असते. आपल्या शेतीसाठी उपयोगी पडणाऱ्या बैलजोडीवर तो खूप खुष असतो. कारण त्याला चांगले दिवस आलेले असतात.

२. 'जखम' या कथेमध्ये लेखक स्वत: एक पात्र बनून वावरताना दिसतो त्याच्या आयुष्याशी निगडित असणाऱ्या प्रसंगाशी एकरूप होताना दिसतो. लेखकाचा भाऊ केशव अण्णा हा आजारी असतो. त्याला कावीळ हा आजार झाल्यामुळे त्याची प्रकृती अतिशय नाजूक असते. त्यामुळे लेखकाने घडलेला सर्व प्रसंग चितारलेला आहे.

३. 'वर्दीतील माणूस' या कथेतील शिक्षक विजय पवार व माणूसकीबरोबर मैत्री जपणारा फौजदार जी.बी.शिंदे या व्यक्तिरेखा तितक्याशा प्रभावाखाली वाटत नाहीत कथानक जरी त्यांच्या भोवती वावरत असले तरी ते तितकेसे उठावदार वाटत नाही.

४. ‘हाकमारी’ या कथेतील सटवा पाटील हा अंधश्रद्धेवर विश्वास ठेवणारी व्यक्ती. कावळ्याची प्रणयक्रिडा पाहिल्याबरोबर तो घाबरतो, अस्वस्थ होतो. कारण कावळ्याची लागण पाहणे हे अशुभ घटनेचा संकेत असतो. अशा या विचाराचा सटवा पाटील दुकानातून नारळ-उदबत्ती विकत आणून घरातील देवाला नारळ उदबत्ती दाखवतो व पत्नीच्या सहाय्याने तो मृत्यूची बातमी तीन नातेवाईकांना सांगण्याचा निर्णय घेतो.

## स्त्री व्यक्तिरेखा :

### १. सुमन :

‘आत्महत्या’ या कथेतील सुमन या स्त्री व्यक्तिरेखेभोवती कथानक वावरताना दिसते. परंपरागत फुलाचा व्यवसाय करणाऱ्या नागोबा माळी याची मुलगी सुमन. पण वडिलांच्या मृत्यूमुळे आपल्या आईबरोबर फुलांचा व्यवसाय करू लागते. पण विधवा असलेली कमळाबाय डोंगरावरील शिवमंदिरामध्ये महाराज आल्यामुळे आपण फुले आणावयास गेल्यास गावातील लोक संशय घेतील या विचाराने ती आपल्या मुलीला सुमनला तेथून फुले आणावयास सांगते पण सुमनला त्या आर्यदेव महाराजाची असणारी वाईट नजर लक्षात आल्यामुळे ती फुले आणण्यास नकार देते पण आंधळेपणाने विश्वास ठेवणारी तिची आई तिला तिच्या मनाविरूद्ध फुले आणावयास पाठवते. “सुमनला नुकतंच सोळाव वर्ष लागलं होतं ती गोऱ्या रंगाची पाच फुट उंचीची होती. निसर्गाने दिलेल्या रेखीव भुवया चंद्राच्या कोरीसारख्या कातीव होत्या. नीट नाक, टोकदार हनवटी, नागेलीच्या पानासारखे ओठ त्या ओठातील हास्य शीतल चांदण्यासारखं होतं सुमनला बघताच म्हाताऱ्यांनाही चेव यावा असं तिच रूप होतं निसर्गाने सुमनवर सौंदर्याची उधळण केली होती.”[२४] अशा या निष्पाप, निरागस सुमनवर पाशवी बलात्कार होतो आणि तिचा कोणताही अपराध नसताना देखील परिस्थितीमुळे तिला आपली जीवनयात्रा संपवावी लागते.

**२.अनुराधा :**

'उतरंड' या कथेतील अनुराधा ही परिवर्तनीय विचारधारा आत्मसात करणारी दिसते. जाती-धर्मांच्या पलीकडे जाऊन विचार करताना दिसते. तिचा विवाह जेव्हा रामदेव या मुलाबरोबर होतो. तेव्हा तिचा पती एच.आय.व्ही. पॉझिटिव्ह आहे हे तिला समजते तेव्हा ती घर सोडून गावकुसाबाहेरील राहणाऱ्या आनंद जाधव याच्या घरी येते आणि त्याच्या घरी आश्रय घेते. तेव्हा ती म्हणते, "मी जात-धर्म पाळत नाही. माणसापेक्षा धर्म मोठा नसतो. जात मोठी नसते. माणसामाणसाची नाती मोठी असतात."[२५] अशा विचाराची अनुराधा मात्र राहूलच्या प्रेमात पडते आणि शेवटी ती धर्मांतर करण्याचा निर्णय घेते.

**३.मुदरीकाबाई :**

'चिकनगुन्या' या कथेत मुदरीकाबाई गावाची भगतीण असते. गावामध्ये चिकनगुन्या हा आजार आल्यामुळे गावातील ठराविक स्त्रिया तिच्या घराकडे जातात आणि मुदरीकाबाईच्या सल्ल्याने मरीआईचा गाडा काढण्याचा निर्णय घेतात. मुदरीकाबाई ही आपला स्वार्थ साधून घेण्याचा प्रयत्न करते. पण जेव्हा तिच्या सांगण्यावरून गावाच्याबाहेर मरीआईचा गाडा सोडला जातो. त्याच क्षणी मुदरीकाबाईला अचानक ताप येतो म्हणजेच तिला चिकनगुण्या होतो. जणू तिचे पितळच उघड पडते.

**गौण स्त्री व्यक्तिरेखा :**

१.'कोवळी पानगळ' या कथेतील रंग्याची आई मुदरिका ही आपल्या मुलाच्या विषयी काळजी व्यक्त करताना दिसते. आपल्या मुलाने शाळा शिकावी अशी तिची इच्छा असते पण शिक्षणाविषयी नापसंती दर्शविणाऱ्या आपल्या मुलावरती ही ती माया करताना दिसते.

२.'माहेर' या कथेतील जिजाबाई हे पात्र विशेष महत्त्वाचे वाटते. एका संसारी स्त्रीची मनोवस्था चित्रित करणाऱ्या प्रयत्न केला आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे निर्माण झालेली माहेरची ओढ त्यामुळे ती अस्वस्थ दु:खी होते आणि एकीकडे चारित्र्यावर संशय घेऊन जाच

करणारे सासू-नवरा अशा अनेक विचाराच्या गर्तेत सापडते व स्वत:चा स्वतंत्र जगण्याचा मार्ग निवडते.

## 'उतरंड' मधील वातावरण निर्मिती :

कथेमध्ये शब्दार्थांच्याद्वारे कल्पित वास्तवाची वातावरण निर्मिती होत असते. वातावरण हा कथेचा मूलघटक आहे. कथेतील पात्र, घटना, प्रसंग, नाट्य, संघर्ष याबाबत वातावरण हा घटक महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडत असतो. पात्रे जिवंत करण्याचा प्रयत्न वातावरण या घटकाकडून होत असतो. कथेमध्ये पात्र वावरत असताना त्याच्या भोवती विशिष्ट प्रकारचे एक जग असते आणि त्याचाच उल्लेख वातावरण म्हणून करावा लागेल. कथेतील पात्र ही कोणत्यातरी भौगोलिक, सांस्कृतिक परिसरात वावरत असतात आणि तो परिसर हा वातावरणाचा भाग समजला जातो. वातावरण या घटकाबद्दल वा.ल.कुलकर्णी म्हणतात, "कोणत्याही विशिष्ट भुप्रदेशात विशिष्ट काळाच्या पार्श्वभूमीवर घटनाप्रसंग घडत असतात. हे स्थळकाळाचे उचित दर्शन घडविणे म्हणजेच पार्श्वभूमी किंवा वातावरण निर्मिती होय."[२६] तर डॉ.आनंद यादव म्हणतात, "वातावरण म्हणजे वातावरणाचा जिवंतपणा, वेगळेपणा"[२७] साहित्यात वातावरण जे जिवंत होते ते पात्रांच्या स्वभावातून, कृती-उक्तीतून, व्यक्तीच्या जिवंतपणासाठी वातावरण निर्माण होते. पात्रांच्या जीवनसरणीचा, स्वभावाचा, कृतीचा, मनस्थितीचा प्रभाव वाचकांवर पाडण्यासाठी वातावरण हा घटक महत्त्वपूर्ण जबाबदारी पार पाडतो. 'उरतंड' या कथासंग्रहातील वातावरण हे स्थल कालाच्या चौकटीत घडलेले दिसून येते. 'उरतंड' या शीर्षक कथेतील महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीने दलितांमध्ये परिवर्तनवादी विचाराचे दालन समृद्ध होण्यास निर्माण झालेले पोषक वातावरणाच्या दृष्टीने पुढील उदाहरण महत्त्वाचे वाटते. "दलितांचे नेते डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी येवला येथे धर्मांतराची घोषणा केली.जातीच्या उतरंडीतले सगळ्यात खालचे मडके हालचाल करू लागले. हजारो वर्षाच्या शाबूत उतरंडीला जबर हादरा बसायला सुरूवात झाली. सामाजिक भूकंप होऊ लागले"[२८] तर 'हाकमारी' या कथेत जे लेखकाने भितीचे वातावरण निर्माण केले आहे त्याचे वर्णन, "अख्या गावात हाकमाराने कहर माजवला व्हता.

गाव जीव मुठीत धरून जगत व्हता. त्या हाकमारीनं पुऱ्या गावाला जिकिरीला आणून सोडलं व्हतं. हाकमारीच्या धास्तीने दिवस मावळला ना मावळला तोच पुरा गाव गुपचूप व्हत व्हता. गावातील घर, शिवार चिडीचूप व्हायचा. रातीला कोणी कुणाला बोलत नव्हते. रात्र झाल्याबरोबर लोक घरादाराला कडीकोंडा लावून झोपी जात व्हते. हाकमारीच्या भीतीने रातीला गाव मुका व्हत व्हता."[२९] तर 'अन्याय' या कथेत भौगोलिक वातावरणात वसलेल्या डोंगरगावाविषयी लेखकाने केलेले वर्णन, "जिल्ह्याच्या सीमेवर डोंगरगाव वसलेलं... अंदाजे पाचशे घरांची वस्ती...गावाच्या तिन्ही बाजूंनी डोंगररांगा...! त्या डोंगररागांत गाव दोरणासारखं खोलगट भागात वसलेलं गावच्या सभोवताली मोठ-मोठी झाडं...गावासभोवती जंगलाचंच राज्य पसरलेलं जणू ? त्या डोंगरातून उंच-उंच माळ टेकड्यातून डोंगरगावात जाण्यासाठी बारीकशी वाकडी-तिकडी पाऊलवाट...त्या पाऊल वाटेवर आता गिट्टी-मुरमाचा कच्चा रस्ता झाला होता. तो कच्चा रस्ता सोडून जर गावात यायच असेल तर त्या वाटेनं मोठ-मोठाले दगड, काटेरी झुडपं...त्यामुळे जपून पाय टाकावं लागे...गावाकडे येताना तारेवरची कसरत करून चालत यावे लागत असे."[३०]

## 'उतरंड' मधील भाषाशैली :

समाज व माणूस यांच्यामध्ये अतूट संबंध जोडणारा 'भाषा' हा महत्त्वाचा घटक आहे. कथेमध्ये ज्याप्रमाणे वातावरणनिर्मिती हा घटक जसा महत्त्वाचा असतो. त्याचप्रमाणे त्या कथेसाठी लेखकांनी वापरलेली वास्तववादी परिसराची भाषा हा घटक महत्त्वपूर्ण भूमिका बाजवतो. जीवनातील वास्तवाचे प्रक्टीकरण साहित्यातून करावयाचे असेल तर लेखकाला त्या त्या जीवनातील भाषेचा वापर करावा लागतो. डॉ.वासुदेव मुलाटे भाषेविषयी म्हणतात, "भाषा म्हणजे कलाकृतीतील आशयाचा एक अपरिहार्य असा आविष्कार असतो. आशयाच्या अनुषंगाने भाषेची ठेवण, मांडणी आणि लय ठरत जाते. तसेच समाजातील स्तरांप्रमाणे भाषेतही स्तर निर्माण होतात."[३१] सिंदगीकरांनी 'उतरंड' या कथासंग्रहासाठी, निवेदनासाठी प्रमाण बोलीबरोबर पात्रांच्या संवादासाठी मराठवाडी बोली असे भाषा उपयोजन वास्तवाभिमुख जीवन दृष्टिकोनातून केले आहे. लेखक जी भाषा वापरतो ती भाषा बोजड, अलंकृततेचा

सोस धरणारी नसते. कथेची भाषा ही आशयानुसार बदलत असते. तसेच ती पात्रांना अनुसरून वापरली जाते.

विलास सिंदगीकरांच्या 'उतरंड' या कथासंग्रहातील भाषेचा विचार करता त्यांनी कथेमध्ये प्रमाणभाषेबरोबर काही म्हणी व वाक्प्रचार यांचाही पुरेपूर वापर केल्याचे दिसून येते.

**म्हणी :**

१. जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाचा उद्धार करी...!"[३२]

२. "येड्या मायचं खुळं न्हेवणं म्या बिगीन परत येल"[३३]

३. "ज्या ताटात खाल्लं... त्या ताटात हागला का ? "[३४]

**वाक्प्रचार :**

१. पोपटराव पाटलाच्या वाड्यावर दु:खाचा डोगंर कोसळला."[३५]

२. "चिमाजी पाटलांनी मन रित केल."[३६]

३. "कुठलेही गाऱ्हाने न मांडता, जिवाची तमा न बाळगता इमाने इतबारे मालकाचे करीत व्हते."[३७]

४. "पोळ्याच्या मानाबरोबर सरपंचपदाचा तुरा शिरपेचात खोवला गेला."[३८]

५. "संधीचं सोनं करायचा मनोदय त्यांनी केला."[३९]

विलास सिंदगीकरांच्या भाषेचा विचार करता आणखी काही वेगळे जाणवते त्यांच्या कथांमध्ये व्यक्तिच्या अपेक्षित सामाजिक संदर्भानुसार काही अभिवादन शब्दांचाही परिणामकारकपणे वापर केला आहे. त्यामध्ये काही उदाहरणाचा विचार करू.

"शेरनाथ, सोयरे होऽ!"

जयभीम ऽ! आनंद जाधव उत्तरला"[४०]

"अण्णा ऽ नमस्कार...हो ऽऽऽ"[४१]

"नमस्कार...सायब...नमस्कार..."[४२]

"मंडळी, नमस्कार ऽऽ!

रामराम ऽ रामराम ऽऽ..."[४३]

"एक साथ नमस्ते ऽऽऽ...!

सुप्रभात मुलांनो ऽ तुम्ही खाली बसा...!"[४४]

तर काही कथेमध्ये हिंदी भाषेचा पुरेपूर वापर केला आहे. त्या दृष्टीने 'वर्दी तील माणूस' ही कथा महत्त्वाची वाटते. त्यामध्ये विजय पवार व मोहम्मद पठाण साहेब यांच्यातील समोरासमोरील ओळख पटविण्याचा संवाद

"आरे भाई, तू जल्दी बहार निकलके जा ? खुदा के वास्ते, तू चूवे की मौत मारा जायगा!"

"चाच्या मैं जळकोटका गाववाला छोकरा हूँ। मै बीस बावीस साल पहिले यहाँ अभ्यास करणे के लिए आया करता था।"

"हां...हां...आभी मालुम हुवा। तू विजय है।

आरे बच्चा, तू इधर आ ऽ।"[४५]

"हिंदी भाषेबरोबर इंग्रजी वाक्यांचाही वापर केला आहे. 'जखम' या वास्तववादी कथेमध्ये ते प्रकर्षाने जाणवते मृत भावाविषयी लेखकाच्या तोंडातून भावनाविवश होऊण इंगजी वाक्य बाहेर पडते ते म्हणजे, "प्लीज डॉक्टर, आय ॲम रिक्वेस्ट यू बिकॉज आय मस्ट वाँटेड माय ब्रदर्स डेड बॉडी विदाआऊट पोस्टमॉर्टम...!"[४६] एकूणच 'उतरंड' या कथासंग्रहातील भाषाशैली ही प्रादेशिक बोलींनी परिपृष्ठ झालेली आहे.

## निष्कर्ष :

१. 'उतरंड' या कथासंग्रहाच्या माध्यमातून मानवतावादी विचाराबरोबर परिवर्तनवादी विचाराची संकल्पना रूजविण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मांतरानंतर जागृत झालेल्या दलित समाजापुढे निर्माण झालेली जाती-उपजातीची उतरंड मांडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला दिसून येतो.

३. अंधश्रद्धा, बलात्कार, शैक्षणिक क्षेत्रातील निष्क्रियता त्याचप्रमाणे आपल्या स्वार्थासाठी भूमिहीन मजुराचा फायदा करून घेणाऱ्या वृत्तीचे चित्रण केलेले दिसून येते.

४. मुक्या प्राण्यांचे, प्रामाणिकपणाबद्दल व त्यांच्यामध्ये असणाऱ्या वेदनेचे व त्याने मिळवून दिलेल्या न्यायव्यवस्थेचे चित्रण कथेत आले आहे.

५. सिंदगीकरांनी कथांसाठी ज्या भौगोलिक, सामाजिक वातावरण निर्मितीचा उपयोग केलेला आहे. ते विशिष्ट स्थल, कालाच्या चौकटीत निर्माण झालेले दिसून येते.

६. कथांमधील व्यक्तिरेखा या वाट्याला येणारे आयुष्य कोणताही प्रतिकार न करता जगतात.

७. त्यांच्या कथांची भाषाशैली हा आशयानुसार बदलेली दिसून येते. त्यामध्ये प्रमाण भाषेबरोबर म्हणी, वाक्प्रचार, इंग्रजी, हिंदी भाषेबरोबर अभिवादन शब्दांचाही वापर केलेला दिसून येतो.

## संदर्भ :


| | | | |
|---|---|---|---|
| १. | सिंदगीकर, विलास | - | 'उतरंड', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती मार्च - २००८, पृ.१७ |
| २. | तत्रैव | - | पृ.२७ |
| ३. | तत्रैव | - | पृ.८८ |
| ४. | तत्रैव | - | पृ.११५ |
| ५. | तत्रैव | - | पृ.११७ |
| ६. | तत्रैव | - | पृ.६९ |
| ७. | तत्रैव | - | पृ.१३३ |
| ८. | तत्रैव | - | पृ.९४ |
| ९. | तत्रैव | - | पृ.९५ |
| १०. | तत्रैव | - | पृ.९५ |
| ११. | तत्रैव | - | पृ.९८ |
| १२. | तत्रैव | - | पृ.९८ |
| १३. | तत्रैव | - | पृ.७७ |
| १४. | तत्रैव | - | पृ.१४० |
| १५. | तत्रैव | - | पृ.४१ |
| १६. | तत्रैव | - | पृ.४२ |
| १७. | तत्रैव | - | पृ.१०७ |
| १८. | तत्रैव | - | पृ.१०९ |
| १९. | तत्रैव | - | पृ.११० |
| २०. | तत्रैव | - | पृ.१६ |
| २१. | तत्रैव | - | पृ.२० |
| २२. | तत्रैव | - | पृ.३८ |
| २३. | तत्रैव | - | पृ.६५ |
| २४. | तत्रैव | - | पृ.७६ |
| २५. | तत्रैव | - | पृ.२९ |
| २६. | कुलकर्णी, वा.ल. | - | 'जिवंत रेखीव कथा', आलोचना, मुंबई, ऑक्टोबर १९६७, पृ. ३४ |
| २७. | यादव, डॉ. आनंद | - | 'ग्रामीणता: साहित्य आणि वास्तव', मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे ३०, प्रथमावृत्ती मे |

१९८१, द्वितीयावृत्ती - जुलै १९९३.

२८. सिंदगीकर, विलास - 'उतरंड', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती मार्च - २००८ पृ.१५

२९. तत्रैव - पृ.८४

३०. तत्रैव - पृ.५६

३१. मुलाटे, डॉ.वासुदेव - 'ग्रामीण कथा स्वरूप आणि विकास', स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती - जाने. १९९२, द्वितीयावृत्ती-ऑगस्ट२००५, पृ.२८७

३२. सिंदगीकर, विलास - 'उतरंड', संगत प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती मार्च - २००८ पृ.१८

३३. तत्रैव - पृ.३४

३४ तत्रैव - पृ.४८

३५. तत्रैव - पृ.४८

३६. तत्रैव - पृ.३७

३७. तत्रैव - पृ.४४

३८. तत्रैव - पृ.४७

३९. तत्रैव - पृ.५८

४०. तत्रैव - पृ.१८

४१. तत्रैव - पृ.३४

४२. तत्रैव - पृ.५४

४३. तत्रैव - पृ.६०

४४. तत्रैव - पृ.६१

४५. तत्रैव - पृ.१०५

४६. तत्रैव - पृ.१४६